
एका गावामध्ये राघव नावाचा एक मुलगा राहत होता. राघव, लोबो, निशा, प्रताप आणि समिना हे पाचही चांगले मित्र होते. त्यांचा हा समूह थोडासा खोडकर पण मनाने खूप चांगला होता. त्यांच्या घरापासून जवळच असलेल्या एका लहानशा शाळेत ते जात असत. ते सर्वजण इयत्ता नववीत शिकत होते. त्यांना त्यांची शाळा खूप आवडत असे.


रोज संध्याकाळी त्यांना क्रिकेट, बॅडमिंटन आणि लपाछपी खेळणे खूप आवडत असे.


त्यांच्या घराच्या मागच्या बाजूस असलेल्या आंब्याच्या झाडाखाली कधीकधी ते तासन् तास गप्पा मारत असत.


मोठे झाल्यावर आपण नेमके काय करायचे असा प्रश्न त्यांना कधी-कधी पडे. राघवला मोठे झाल्यानंतर कुणीतरी प्रसिद्ध व्यक्ती होण्याची इच्छा होती मात्र त्यासाठी नक्की काय केले पाहिजे हे त्याला कळत नव्हते.


लोबोला स्केचिंग करणे अणि प्रतिकृती तयार करणे चांगले जमत असे. मोठे झाल्यानंतर वास्तूरचनाकार बनण्याचे त्याचे स्वप्न होते.
समिनाने मोठे झाल्यानंतर शिक्षिका व्हावे अशी तिच्या वडीलांची इच्छा होती.
प्रताप मात्र संभ्रमात असे. दिवसाला तीन वेळा त्याच्या महत्त्वाकांक्षा बदलत असत.
निशा त्या सर्वांत बिनधास्त होती. आपण मोठे झाल्यानंतर कोण होणार हा प्रश्न देखील तिच्या मनात येत नसे.
एके दिवशी सर्वजण, त्यांच्या नेहमीच्या ठिकाणी एकत्र जमले. तो दिवस प्रत्येकासाठी वाईट ठरला होता. लोबोला त्याच्या वर्गाच्या चाचणीत कमी गुण मिळाले होते. राघवने एका धोक्याच्या सायकल शर्यतीत सहभागी होण्यास नकार दिला म्हणून त्याला सर्वजण 'भित्रा' म्हणून चिडवू लागले. प्रतापचा त्याच्या पालकांसोबत वाद झाला होता.
समिनाला तिच्या पालकांनी नवीन ड्रेस खरेदी करण्यास नकार दिल्यामुळे ती नाराज होती आणि निशाला एकटीला ट्रेकिंगला जाण्यास तिच्या पालकांनी नकार दिल्यामुळे ती दु:खी होती. ते सर्वजण सारे कसे वाईट चालले आहे याबद्दल बोलत होते. आपली परिस्थिती बदलण्याची शक्ती आपल्यात असती तर किती बरे झाले असते असे त्यांना वाटून गेले.
तितक्यात त्यांनी एक मोठ्ठा आवाज ऐकला. (झॅ....प)
ZAP!
त्यांनी मागे वळून पाहिले आणि जे काही पाहिले ते थक्क करणारे होते.
नमस्कार मित्रांनो, आम्ही तुम्हांला घाबरवलं तर नाही ना? मी असं ऐकलं की, कुणीतरी शक्तीशाली बनण्यास इच्छुक आहे.


अरे व्वा! धैर्यधर आणि धैर्यशीला!
माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसत नाही! तुम्ही खरंच इथे आहात?
आता मी माझ्या संपूर्ण वर्गाला प्रत्यक्ष धैर्यधर आणि धैर्यशीला यांना भेटल्याचे सांगणार आहे.
तुमच्यातील शक्ती किंवा सामर्थ्य तुमच्यामध्ये कोठून येतात?
खरी सामर्थ्ये ही तुम्हांला स्वत:ला ओळखण्यातूनच येतात! आपण कोण आहोत हे स्वत:ला ओळखता आले पाहिजे.
हे ज्याचे त्यालाच शोधावे लागते बाळा!
पण मी कोण आहे?

# १ स्व-ओळख

**स्वत:तील क्षमता ओळखणे..**

CHCVQ8

**उद्‌दिष्टे :**

(१) स्वत:च्या शब्दात 'स्व-ओळख' म्हणजे काय ते सांगता येणे.


(२) स्व-ओळख यावर परिणाम करणारे घटक ओळखता येणे.

(३) 'प्रत्येक व्यक्तीची ओळख वैशिष्ट्यपूर्ण असते' याचे स्पष्टीकरण देता येणे.

(४) स्वत:ची बलस्थाने, उणिवा, विकासाच्या संधी आणि विकासाच्या मार्गातील आव्हाने यांचा आराखडा तयार करता येणे.


## १. माझे नाव :

- माझ्या नावाचा अर्थ काय?
- स्वत:चे नाव बदलावेसे वाटते का? कारण काय?
- नाव बदलले तरी तुम्ही तीच व्यक्ती असाल का? कारणे सांगा.



या विषयासाठी एक २०० पानी स्वतंत्र वही करायला सांगावी. तिला कव्हर घालून सुशोभित करावी. या पुस्तकातील सर्व कृती वहीत लिहावयाच्या आहेत.

## २. माझे चित्र :




स्वत:ची ओळख ज्या चित्रातून स्पष्ट होईल असे चित्र वहीत काढा. ते प्रत्यक्ष तुमचे असू शकेल किंवा एखाद्या प्राण्याचे, वस्तूचे - ज्याचे गुण स्वत:शी मिळते-जुळते आहेत/किंवा मुक्त चित्र स्वरूपाचे असू शकेल. त्या चित्रातून तुमची ओळख झाली पाहिजे. वर दाखवलेली चित्रे केवळ उदाहरणादाखल आहेत. तुमच्या चित्राचे थोडक्यात वर्णन करा. त्यात तुम्ही काढलेल्या चित्राचा अर्थ किंवा स्पष्टीकरण द्या. तुमची वही शेजारी बसलेल्या विद्यार्थ्याला द्या आणि त्याची वही तुम्ही घेऊन त्याचे चित्र समजून घ्या.

## ३. व्यक्तिगत अनुभव :








आतापर्यंतच्या जीवनातील काही सुखाचे आणि काही दु:खाचे प्रसंग, वाचलेली पुस्तके; पाहिलेली गावे (जागा/ठिकाणे), पाहिलेले चित्रपट यांचा आपल्या वृत्तीवर, विचारांवर, स्वभावावर खोलवर परिणाम झालेला दिसतो.

**अशा परिणाम केलेल्या घटनांना महत्त्वाचे अनुभव समजले जाते.**

तीन अनुभव निवडा. उदा. धाकट्या भावंडाचा जन्म; एखाद्या खेळाडूच्या जीवनावरील चित्रपट; पालकांनी शेजाऱ्यांना केलेली मदत; पाहिलेला अपघात यासारखा महत्त्वाचा वाटणारा कोणताही अनुभव लिहिता येईल.


बालपणापासूनचे सर्व महत्त्वाचे 'अनुभव' वहीत लिहिण्यास सांगावे.
त्या प्रसंगातून/अनुभवातून व्यक्तिमत्त्वावर परिणाम केलेले तीन मुख्य अनुभव निवडायला सांगा.
त्या अनुभवातून ते काय शिकले ते लिहायला सांगावे.




या अनुभवातून जे शिकतो त्याचा व्यक्तिमत्त्वावर परिणाम होतो.

## ४. स्फूर्ती देणाऱ्या व्यक्ती किंवा आदर्श व्यक्ती :

स्वत:ला प्रेरित करणाऱ्या किंवा आदर्श वाटणाऱ्या तीन व्यक्तींची नावे लिहा. त्या व्यक्ती तुमचे पालक, शिक्षक, खेळाडू, कलाकार, प्रसिद्ध व्यक्ती यापैकी कोणीही असू शकतील.






## ५. अभिमान वाटणाऱ्या गोष्टी :

एखाद्या विशिष्ट किंवा चांगल्या कृतीचा आपल्याला अभिमान वाटतो. त्या घटना किंवा प्रसंग आठवून आनंद होतो.

अशा अभिमान वाटणाऱ्या तीन घटना आठवा आणि वहीत लिहा.



अभिमान वाटणाऱ्या गोष्टींची पदके किंवा बिल्ले (बॅजेस) तयार करून घ्यावीत, ती गणवेशावर लावायला सांगावीत.
विद्यार्थ्यांना वर्गात फिरू द्या. त्यांना थांबायला सांगितल्यानंतर प्रत्येकाने आपल्यासमोर असलेल्या विद्यार्थ्याला स्वतःच्या पदकांबद्दल, ती केव्हा मिळाली ते सांगायचे. यामुळे परस्परांच्या गुणांची ओळख होईल.

चांगल्या तीन कृतींचे किंवा मिळालेल्या बक्षिसांचे बिल्ले (बॅजेस) किंवा पदके वहीत काढावी. प्रत्येक चित्राखाली ते पदक स्वतःला कशासाठी बहाल करीत आहात ते लिहा. खालील चित्रात काही नमुने दाखवले आहेत.



दररोज आईला स्वयंपाकात मदत केली.



खो-खो ची मॅच जिंकली.



एका व्यक्तीला संकटातून वाचवले.

विद्यार्थ्यांच्या गुणांचे कौतुक करा, विद्यार्थ्यांचे व्यक्ती म्हणून कौतुक करू नका. विद्यार्थ्यांना अभिमान वाटणारे साधे उदाहरण देखील स्वीकारा.

अभिमान वाटणाऱ्या गोष्टी शाळेनुसार, परिसरानुसार, भौगोलिक, सामाजिक परिस्थितीनुसार बदलतील याची कल्पना द्यावी. ज्याप्रमाणे काही कृतींचा आपल्याला अभिमान वाटतो, त्याप्रमाणे हातून घडलेल्या काही कृतींचा अथवा सोबत घडलेल्या घटनांचा तिटकारा वाटतो. त्या कोणाला सांगू नयेत असे वाटते.

## ६. माझ्या भाव-भावना :

वेगवेगळ्या प्रसंगातील प्रतिक्रिया किंवा वर्तन हे भाव-भावनांवरून ठरते. वैशिष्ट्यपूर्ण भावनिक प्रतिक्रियांमुळे आपण इतरांपेक्षा वेगळे दिसून येतो.

प्रेम, राग, आनंद, दु:ख, भीती यांसारख्या भावनांचा अनुभव येतो तेव्हा प्रत्येकाचे वर्तन काही बाबतीत समान तर काही बाबतीत भिन्न असते. प्रत्येक प्रसंगातील भावनानुभव नीट समजून घ्यावयास हवा.

प्रत्येक प्रसंग वाचून या प्रसंगाला कोणती प्रतिक्रिया दिली ते पहावे. प्रत्येक पर्यायी उत्तर किती विद्यार्थ्यांनी दिले ते पहावे. यावरून एकाच प्रसंगाला प्रतिक्रिया वेगवेगळ्या असू शकतात हे समजते. एखादा काल्पनिक प्रसंग देऊन विद्यार्थी त्यावेळी कसे वागतील अशा देखील प्रतिक्रिया विचाराव्यात.

**खाली नमूद केलेल्या प्रसंगात तुम्हांला काय वाटते? तुमच्या प्रतिक्रिया वहीत लिहा.**

**स्पर्धेत तुम्ही हरलात.**
१. नैराश्य
२. राग
३. मत्सर
४. काही वाटणार नाही.
५. याशिवाय इतर

**काहीतरी अवघड किंवा धाडसी कृती करण्याचे आव्हान दिले गेले.**
१. उत्साह
२. भीती
३. हतबल
४. काही वाटणार नाही.
५. याशिवाय इतर


**एखाद्या गर्दीच्या ठिकाणी तुम्ही आहात.**
१. आनंदी/शांत
२. असुरक्षित
३. उत्साह
४. याशिवाय इतर

**(कोणीतरी) तुमचे कौतुक/प्रशंसा केली.**
१. अभिमान वाटेल
२. वर्चस्व/मोठेपणा
३. उत्साह
४. याशिवाय इतर

**तुमच्यावर टीका किंवा दोषारोप केले.**
१. दु:ख
२. राग
३. कमीपणाची भावना
४. उदासीनता
५. याशिवाय इतर

**तुम्ही एकटे आहात.**
१. स्वस्थ वाटेल/समाधान
२. उदास
३. अस्वस्थ
४. असुरक्षित
५. याशिवाय इतर

**खालील चित्रांतील भावना ओळखून त्यांची नावे लिहा. या भावना तुम्ही कोणत्या प्रसंगी अनुभवल्या आहेत? अशा वेळी टोकाची भूमिका घेतली आहे का? त्यात काही नुकसान झाले आहे का? तीव्र, टोकाच्या भावना किती काळ टिकतात याबद्दल विचार करा व तुमच्या वहीत नोंद करा.**




## भावना व विचार :

खालील वाक्यांचा विचार करा –

१. काही लोकांना रात्री खूप उशिरा घरी एकटे चालत येताना ‘भीती वाटते’. का? कारण त्यांच्या मनात ‘विचार’ येतो की त्यांना रस्त्यात कोणी लुबाडले तर?

२. एखाद्या स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाल्यावर ‘आनंद होतो’. का? कारण मनात असा ‘विचार’ येतो की आपण केलेल्या कष्टांचे फळ आपल्याला मिळाले.

३. आपण न केलेल्या चुकीबद्दल आपल्याला कोणी रागावले तर आपल्याला ‘राग येतो’. कारण आपल्या मनात असा ‘विचार’ येतो की, आपल्यावर अन्याय होतो आहे.

वरील उदाहरणावरून असे दिसून येते की, आपल्या भावनांचा आणि विचारांचा परपस्परसंबंध आहे. आपल्याला वाटणाऱ्या तीव्र भावना आपल्या मनातील कोणत्या विचारांमुळे निर्माण झाल्या आहेत हे समजून घेऊ शकलो तर त्या भावनांचे व्यवस्थापन करणे सुलभ होईल.

## ७. माझ्या भूमिका :

एकाच वेळी व्यक्तीला मुलगा-मुलगी, भाऊ-बहीण, विद्यार्थी, मित्र अशा अनेक भूमिका कराव्या लागतात व त्याप्रमाणे वागावे लागते.

प्रत्येक भूमिकेत व्यक्तीने कसे वागायचे याविषयी भोवतालच्या व्यक्तींच्या, समाजाच्या काही अपेक्षा असतात.

मुलगा-मुलगी, आई-वडील या भूमिकेतील व्यक्तींनी कसे वागावे याबद्दल समाजाची ठरावीक मते असतात. त्यांना 'साचेबंद कल्पना' किंवा 'स्थिरप्रतिमा' म्हटले जाते. खाली काही उदाहरणे दिली आहेत-



मुलगे रडत नाहीत. ते आडदांड, चिवट आणि कणखर असतात. मुलगे स्वयंपाकघरात काम करत नाहीत.



स्वयंपाक हा स्त्रियांनीच केला पाहिजे. आईने स्वतःच्या नोकरी/व्यवसायापेक्षा मुलांच्या संगोपनाकडे जास्त लक्ष द्यावे. मुलांना नीट वाढविणे, त्यांची काळजी घेणे ही आईची जबाबदारी जास्त आहे.

साचेबंद कल्पनांची जी नमुना उदाहरणे दिली आहेत त्यासंबंधी सविस्तर चर्चा करा.
या उदाहरणातील मतांशी विद्यार्थी सहमत आहेत का? त्यांच्या कारणांवर चर्चा करा.
इतर काही भूमिकांच्या साचेबंद कल्पना विद्यार्थ्यांना माहीत आहेत का? अशा साचेबंद कल्पना आणि अपेक्षा बदलल्या पाहिजेत असे मुलांना वाटते का?
साचेबंद कल्पना बरोबर असतीलच असे नाही. काळानुसार त्यांच्यात बदल होतात, हे समजावून सांगावे.






मुली शारीरिक मेहनतीची कामे करू शकत नाहीत. त्या सहनशील, नम्र, आज्ञाधारक असतात.
शिवणकाम, भरतकाम हे फक्त मुलींचेच काम आहे.

कुटुंबातील महत्त्वाचे निर्णय हे वडलांनी घ्यावेत.
कुटुंबाच्या चरितार्थासाठी वडलांनीच पैसे मिळवले पाहिजेत.

या विविध भूमिकांचा आणि त्या भूमिकेकडून अपेक्षित वर्तनांचा विचार करावा.

चित्रात एका व्यक्तीच्या भिन्न भूमिकांच्या वर्तनाचे उदाहरण दिले आहे. उरलेल्या भूमिकांच्या वर्तनाची उदाहरणे तुम्ही पूर्ण करा.





एका व्यक्तीच्या विविध भूमिका दाखवल्या आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला या सर्व भूमिका लागू असतीलच असे नाही. या उदाहरणाप्रमाणे स्वतःच्या भूमिका आणि त्या भूमिकेकडून अपेक्षित वर्तनाचे रेखाचित्र वहीत काढावे.

## थोडी गंमत


### एकासारखे दुसरे ओळखणे :

विद्यार्थ्यांचे चार-चारचे गट करावेत. त्यांना शाळेच्या मैदानावर घेऊन जावे. फुले, पाने, दगड, काटक्या अशा कोणत्याही वस्तूचे दोन अगदी समान नमुने गोळा करायला सांगावे.



पुढील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करावी. कोणत्याही गटाला दोन अगदी समान वस्तू मिळाल्या नसल्यास का मिळाल्या नाहीत? माणसांच्या बाबतीतही अशी भिन्नता कोणत्या वैशिष्ट्यांबाबत आढळते?

जमा केलेल्या दोन वस्तूंमध्ये थोडाही फरक चालणार नाही अशी सूचना द्यावी. वस्तू शोधायला मुलांना दहा मिनिटे द्यावीत.




### गुण-दोष सांगणे :

वर्गातील दोन गटांपैकी एका गटाने फूल, फळ, प्राणी, पदार्थ, वाहन, ठिकाण यांपैकी कोणतेही एक नाव सांगावे. त्याचे चांगले गुणवैशिष्ट्य सांगावे.

दुसऱ्या गटातील मुलांनी त्याच्या मर्यादा किंवा दोष सांगावेत.

आता दुसऱ्या गटाने नाव निवडून त्याचे गुण सांगावेत.

पहिल्या गटाने त्याचे दोष सांगावेत.

जेव्हा कोणत्याही एका गटाला दोष किंवा मर्यादा सांगता येणार नाहीत तेव्हा किंवा काही मिनिटांनंतर खेळ थांबवावा.


**चर्चा करा :**
ज्या वस्तूंना काहीच मर्यादा किंवा दोष नाहीत असे नाव सापडले का? हीच गोष्ट माणसांना लागू होते का? कशा प्रकारे?



आईसक्रीम

## थोडी गंमत

### (१) हे करून पहा :




(अ) पेन हातात घ्या. पहिले बोट व मधले बोट न वापरता उरलेली तीन बोटे वापरून दोन-तीन वाक्ये लिहा.


(ब) चित्रात दाखवल्याप्रमाणे पाचही बोटांभोवती दोरा गुंडाळा. आता या हाताने चित्र काढणे, जमिनीवरची लहान वस्तू उचलणे. झाडावर चढणे, खुर्ची उचलणे. या क्रिया करायला जमतात का ते अनुभवा.

**चर्चा करा :**
दोन्ही कृती करणे सोपे होते का? कारण सांगा. या कृतीतून वेगवेगळ्या बोटांचे महत्त्व समजले का?

### (२) उत्तम व्यक्ती

खालील चित्रातील व्यक्तींची माहिती घ्या. त्यांच्यातील कोणते गुण तुम्हांला जास्त आवडले?





आवडलेल्या गुणांविषयी चर्चा करा. याखेरीज तुम्हांला आवडलेल्या व्यक्तींच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणांविषयी चर्चा करा. या चारही व्यक्ती आपापल्या क्षेत्रात मोठ्या आहेत.





***विचारात घेण्याचे मुद्दे :***

- *प्रत्येक व्यक्ती ही तिच्या विशेष क्षमता व सामर्थ्यांमुळे वेगळी व एकमेव असते.*
- *ज्याप्रमाणे हाताने पूर्ण क्षमतेने काम करण्यासाठी पाचही बोटांचा उपयोग होतो, त्याचप्रमाणे जीवनात प्रगती करण्यासाठी आणि समाधानाने जगण्यासाठी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण गुणांची, मर्यादांची जाणीव व्यक्तीने ठेवली पाहिजे.*

## वाचा आणि समजून घ्या.



शारीरिक ठेवण, क्षमता, स्वभाव वैशिष्ट्ये, धारणा आणि भाव-भावना या सर्व गोष्टींचा एकत्र विचार केल्यास प्रत्येक व्यक्ती वेगळी, वैशिष्ट्यपूर्ण अशी एकमेव असते. व्यक्तीची ही सर्व वैशिष्ट्ये मिळून तिची 'स्व-प्रतिमा' अथवा स्व-ओळख ठरते.

**तुमची ओळख कोणत्या वैशिष्ट्यांमुळे आहे?**

स्वतःबद्दल विचार करा. तुमची शारीरिक ठेवण, क्षमता, मानसिक गुण, श्रद्धा, कौटुंबिक माहिती, भावना व स्वभाव इत्यादी विषयी माहिती असणारी कविता मुक्त शब्दांत लिहा. कवितेत पुढील मुद्दे अपेक्षित आहेत.

मी ..........................................................(नाव लिहा)
(पालकांचे नाव) .....................................(यांचा मुलगा/मुलगी)
बहीण, भावांची नावे .......................................................
माझी आवड (तीन गोष्टी) ..................................................
मला आवडत नाही (तीन गोष्टी) ..........................................
मी तिरस्कार करतो .........................................................
माझी शारीरिक व स्वभाव वैशिष्ट्ये (दोन-दोन) ...........................
मला करायचे आहे (तीन गोष्टी)..........................................
मला वाटणारी भीती (एक) ..................................................
माझे स्वप्न (एक) ...........................................................
माझी इच्छा (एक) ..........................................................
माझा निश्चय (एक) .........................................................
याचा मला अभिमान आहे (एक) ...........................................

(ही कविता ('बोलगाणी' प्रकारात) मुक्त शब्दात लिहा. यमक जुळवण्याची आवश्यकता नाही.)

***विचारात घेण्याचे मुद्दे :***

- *प्रत्येक व्यक्तीत काही क्षमता आणि काही मर्यादांचे मिश्रण असते.*
- *स्वत:ची बलस्थाने आणि सुधारणा करण्याची क्षेत्रे व्यक्तीने समजून घेतली पाहिजेत.*
- *तुमच्या सुधारणा क्षेत्रांवर तर काम करायला हवेच, परंतु त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे तुमची बलस्थाने विकसित करण्यावरती अधिकाधिक भर दिला पाहिजे.*
- *विकासाच्या संधी आणि प्रगतीच्या मार्गातील आव्हाने समजून घेणे महत्त्वाचे आहे.*

## ८. स्व-अहवाल :

स्वतःचे मूल्यमापन केल्याने आपल्याला स्वतःची माहिती कळते. यात स्वतःचे सामर्थ्य (विकासाची क्षेत्रे), अपेक्षित सुधारणा, विकासाच्या संधी, विकासाच्या मार्गातील अडचणी आणि आव्हाने यांची सविस्तर माहिती मिळते. यावरून स्वतःच्या प्रगतीचा किंवा सुधारणांचा आराखडा तयार करता येतो.

खाली एका व्यक्तीच्या माहितीचा आराखडा दिला आहे. तो वाचा.

| निकष | माझी बलस्थाने | सुधारणा करण्याची क्षेत्रे |
|---|---|---|
| ज्ञान | मला भाषा आणि गणित चांगले येते. | मला समाजशास्त्रे नीट समजत नाहीत. |
| कौशल्य | मी कथा-कविता लिहितो.<br>मला खाद्यपदार्थ चांगले बनवता येतात. | मला सभेत बोलायची भीती वाटते.<br>मी चांगला खेळाडू नाही. |
| दृष्टिकोन | चिकाटीने दीर्घकाळ काम करू शकतो. | दुसऱ्यांच्या भावनांचा विचार करत नाही. |
| सामाजिक (पालक, मित्र, नातेवाईकांसंबंधी) | माझी कोणाशीही चटकन मैत्री होते. | माझ्या निर्णयांवर माझ्या मित्रांचा प्रभाव असतो. |
| आर्थिक | माझ्या पालकांची आर्थिक स्थिती चांगली आहे. | - |
| **निकष** | **विकासाच्या संधी** | **विकासातील आव्हाने** |
| ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टिकोन | मी पुढील क्षेत्रात प्रगती करू शकेन.<br>(१) साहित्य (२) गणित<br>(३) उपाहारगृह व्यवस्थापन | माझ्या गावात भाषा विषयातील उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय नाही. |
| सामाजिक (पालक, मित्र, नातेवाईकांसंबंधी) | माझे पालक शिक्षण महत्त्वाचे मानतात. त्यामुळे ते माझ्या लग्नाची घाई करणार नाहीत. | नातेवाईक माझे लग्न करण्यासाठी पालकांवर दबाव आणतील. |
| सामाजिक-आर्थिक स्थिती | माझे पालक माझ्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत करतील. | उच्च शिक्षणासाठी पालक मला शहरात पाठवायला तयार होणार नाहीत. |

## माझा स्व-अहवाल :

वरील आराखड्याच्या मदतीने स्वत:ची बलस्थाने, सुधारणा क्षेत्रे आणि विकासाच्या संधी, आव्हाने यांचा सर्वंकष विचार करून तुमच्या वहीत स्व-अहवाल तयार करा.

स्व-अहवाल तयार करणे ही फार महत्त्वाची वर्गकृती आहे. विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमतांचा, मर्यादांचा विचार योग्य रीतीने करायला मार्गदर्शन करा. विकासाच्या संधींची तसेच सामाजिक व परिस्थितीजन्य अडचणींची माहिती द्यावी.

## मूल्यमापन

विद्यार्थ्यांना गुण देण्यासाठी खाली मार्गदर्शन तक्ता दिला आहे. या प्रकरणातील माहिती केवळ लक्षात ठेवण्यासाठी नसून स्वतःबद्दल व सामाजिक परिसराबद्दल विचार करण्यासाठी दिलेली आहे. या प्रकरणातील प्रकल्प व कृती त्यांनी कशा केल्या, त्याचे मूल्यमापन करा.

| भारांश १०% | | | | |
|---|---|---|---|---|
| **निकष** | **खूप चांगले (उत्तम)** | **योग्य (समाधानकारक)** | **अयोग्य (असमाधानकारक)** | **गुण** |
| कृती करताना उत्साही सहभाग. | पाठातील प्रत्येक कृती उत्साहाने पूर्ण केल्या. (सक्रिय सहभाग) सर्व वर्गकृती वहीत पूर्ण केल्या. | पाठातील सर्व कृती पूर्ण केल्या. | दुसऱ्या विद्यार्थ्यांच्या वहीत पाहून कृती पूर्ण केल्या. | |
| स्वतःचे विश्लेषण करून बलस्थाने, सुधारणा करण्याची क्षेत्रे, प्रगतीच्या संधी यांचा स्व-अहवाल | स्वतःची बलस्थाने, सुधारणा -क्षेत्रे, विकासाच्या संधी यांचा विचार करून स्पष्ट शब्दात स्व-अहवाल लिहिला. | बलस्थाने, उणिवा, सुधारणा क्षेत्रे, विकासाच्या संधी लिहिल्या. परंतु त्या ढोबळ मानाने लिहिल्या. | दुसऱ्यांच्या वहीत पाहून आराखडा लिहिला. | |
| 'स्व-ओळख' करून देणारी कविता | कवितेतून त्या विद्यार्थ्यांची/ विद्यार्थिनींची ओळख स्पष्ट होते. | कविता विचारपूर्वक लिहिली नाही. कवितेतून ओळख स्पष्ट होत नाही. | कविता लिहिली नाही. | |


यो हो! माझ्या मित्रांनी मला खडकाळ रस्त्यावरती सायकल शर्यत लावण्याचे आव्हान दिले होते आणि मी त्यात जिंकलो! हे अतिशय थरारक होते. कितीतरी वेळा मी पडलो असतो पण तरी मी पूर्ण केले! आज मला स्वतःच धैर्यधर झाल्यासारखे वाटतेय.
हूं ऽ... पण राघव, आपल्यात एक छोटा फरक आहे. मला उडण्याचा भरपूर सराव आहे पण तुझे हे वागणे पूर्णतः अविचारी आणि धोक्याचे आहे.
जेव्हा आम्ही उडतो तेव्हा आम्ही खूप काळजी घेतो. सर्व धोक्यांची आम्हाला जाणीव असते. आम्ही अनावश्यक जोखीम घेण्याचा कधीच प्रयत्न करीत नाही. पण तुला ती शर्यत मुळातच खूप आवडली, कारण ती धोक्याची होती.
मला वाटते, यात तुझा दोष नाही. हे तुझ्या किशोरवयीन मेंदूचे काम आहे. तुला त्याबद्दल अधिक जाणून घ्यायचे आहे का?